' प्रेस नोट '

दिनांक १०/०६/२०२५

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती. बेबी कर्णुजी मेश्राम वय ५७ वर्ष पद– सह दुय्यम निबंधक (वर्ग–०२) नेमणुक– सह दुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती<br>२) श्री.किशोर जयरामजी रायबोले, वय–४९ वर्ष, व्यवसाय – खाजगी खरेदी विक्रीचे काम करणे, रा.सिध्दार्थ नगर, सिव्हील लाईन,अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रु. |
| घटनास्थळ | सहदुय्यम निबंधक कार्यालय परीसर,अमरावती |
| घटना ता. व वेळ | दि.१०/०६/२०२५ चे १४.४२ ते १४.४७ वा. चे सुमारास. |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार हे फ्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत असून त्यांनी सन २०२१ मध्ये अमरावती येथे त्यांचे व त्यांची पत्नी यांचे नांवे एक फ्लॅट खरेदी केला होता. सदर फ्लॅट चे गृहकर्ज व उसनवार पैसे देणेकरीता तक्रारदार यांनी सदरचा फ्लॅट त्यांचे बहिणीला विकण्याचे ठरविला. त्याकरीता ते सहदुय्यम निबंधक कार्यालय कमांक २ अमरावती येथे सदरच्या फ्लॅट चे विक्रीकरीता गेले असता तेथे असलेले खाजगी इसम श्री. रायबोले यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचे फ्लॅट चे कागदपत्रे पाहुन म्हटले की, ''सदर फ्लॅटचा ७/१२ तुमच्या नांवे नसल्यामुळे सदर फ्लॅटची विक्री होवु शकणार नाही. मी सह दुय्यम निबंधक श्रीमती बेबी मेश्राम मॅडम यांना भेटुन मी तुमचे काम करून देवु शकतो'' खाजगी इसम श्री.रायबोले यांनी तक्रारदार यांना त्यांचे फ्लॅट ची विक्री करून देण्यासाठी ५,०००/– रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १०.०६.२०२५ रोजी लेखी तक्रार दिली.

नमुद तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान खाजगी व्यक्ती श्री.रायबोले यांनी तक्रारदार यांना ५०००/– रु. लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविली व खाजगी व्यक्ती श्री.रायबोले यांनी तक्रारदार यांची सह दुय्यम निबंधक श्रीमती मेश्राम मॅडम यांची भेट करुन दिली असता, त्यावेळी तक्रारदार यांनी श्रीमती मेश्राम मॅडम यांना उददेशून म्हटले की, पाच हजार म्हणून राहीले मॅडम' त्यावेळी श्रीमती मेश्राम मॅडम यांनी खाजगी व्यक्ती श्री.रायबोले यांना उददेशून म्हटले की, 'यांचे काय आहे ते तुम्ही पाहून घ्या व निपटून घ्या' असे म्हणून श्री. रायबोले यांना सह दुय्यम निबंधक श्रीमती मेश्राम मॅडम यांनी लाच स्वीकारण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले व सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम श्री.किशोर जयरामजी रायबोले,वय–४९ वर्ष, व्यवसाय – खाजगी खरेदी विक्रीचे काम करणे, रा.सिध्दार्थ नगर, सिव्हील लाईन,अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष ५०००/–रुपये स्विकारली वरुन आलोसे श्रीमती. बेबी कर्णोजी मेश्राम वय ५७ वर्ष पद– सह दुय्यम निबंधक (वर्ग–०२) नेमणुक– सह दुय्यम निबंधक कार्यालय, अमरावती व आरोपी श्री.किशोर जयरामजी रायबोले, वय–४९ वर्ष, व्यवसाय – खाजगी खरेदी विक्रीचे काम करणे, रा.सिध्दार्थ नगर, सिव्हील लाईन,अमरावती. यांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीविरुदध पो.स्टे.गाडगेनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधिक्षक श्री.मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री.सचिन्द्र शिंदे,पोलीस उपअधिक्षक श्री.सुनिल किनगे,पोलीस उपअधिक्षक श्री.मंगेश मोहोड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक चित्रा मेसरे, पोलीस निरीक्षक श्री.योगेशकुमार दंदे, पोलीस अंमलदार प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, आशिष जांभोळे, उपेंद्र थोरात, चित्रलेखा वानखडे , चालक पोहेकॉ गोवर्धन नाईक यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**सपर्क –** अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. ललील सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
**टोल फ्री कमांक – १०६४, दुरध्वनी कमांक ०७२१– २५५२३५५, २५५३०५५**

(चित्रा मेसरे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती